महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ अॅटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ७९ वा | गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# जिल्हा परिषद निवडणुकीत पेनुर जिल्हा परिषद गटात होणार पंचरंगी घमासान

## एकाच पेनुर मधील दोन चवरे येणार आमने- सामने

### मात्र 'त्या दोन चवरेंची'पडद्यामागील भूमिका मात्र गुलदस्त्यात

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ तालुक्यात राजकीय दृष्ट्या सातत्याने चर्चेत असलेल्या पेनुर जिल्हा परिषद गटात आरक्षण सोडतीनंतर जोरदार राजकीय विहरचनेला प्रारंभ झाला आहे. पेनुर मधील शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांच्या विरोधात अनगरकर -पाटील परिवाराचे खंदे समर्थक रामदास चवरे हे उभे ठाकणार आहेत. तर गेल्या विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीपासून माजी आमदार राजन पाटील यांच्यापासून चार हात दूर असलेले माजी उपसभापती मानाजी माने या निवडणुकीत नेमकी काय भूमिका घेणार ? हे सध्या गुलदस्त्यात आहे. जेष्ठ नेते मानाजी माने जरी सध्या तटस्थ असले तरी त्यांचे सुपुत्र विक्रांत माने आणि अनगरकर - पाटील परिवारातील बाळराजे पाटील आणि अजिंक्यराणा पाटील यांच्यामधील जवळीक पुन्हा जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी वाढली आहे. त्यामुळे माने परिवाराची



येत्या काळातील राजकीय भूमिका नक्की कोणाच्या पथ्यावर पडणार याबाबत संभ्रमावस्था कायम आहे. यामध्ये पेनुर मधील दोन चौरे जरी एकमेकांविरोधात टाकणार असले तरी या दोघांच्या मागील "ते दोन चवरे " नेमके कोणाचे काम करणार याबाबत उत्सुकता कायम आहे.

गाव पातळीवरील एक सामान्य कार्यकर्ता ते शिवसेना शिंदे गटासारख्या मोठ्या पक्षाचा जिल्हाप्रमुख अशी अल्पावधीतच राजकीय गरुड भरारी घेणारे चरणराज चवरे यांचे यश केवळ राष्ट्रवादीलाच नाही तर महायुती मधील अन्य मित्रपक्षांना देखील चांगलेच खटकत आहेत. मात्र विरोधकांच्या टीकाटिपणीला प्रतिउत्तर न देता त्यांनी पेनुर ते मुंबई अशा मॅरेथॉन वाऱ्या करत डीपीडीसीचे मिळवलेले सदस्यपद आणि त्या माध्यमातून पेनुरचा सुपुत्र म्हणुन जि. प. मध्ये गाजवलेला प्रचंड आवाज या बाबी प्रचंड चर्चेत आल्या. जिल्हा नियोजन म्हणजे डी. पी. डी. सी. च्या त्या माध्यमातून निधी खेचून आणत केलेली रस्त्यांची विकास कामे या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. जरी चरणराज चवरे विकासाबाबत अग्रेसर असले तरी त्यांच्यासोबत रणनीती आखणारी मंडळी तितकीशी राजकीय दृष्ट्या



अनुभवी नाही. मात्र चरणराज चवरे यांच्या राजकीय जीवनातील गुरु उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, कॅबिनेट मंत्री ना भरतशेठ गोगावले, खासदार श्रीकांत शिंदे, परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक यांचे मार्गदर्शनाचे मोठे पाठबळ त्यांच्या पाठीशी आहे. मात्र या जि. प. गटा.तील अनेक गावात राष्ट्रवादी अनगरकर - पाटील परिवारालाही मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र भीमा परिवाराच्या पट्टूयात हा जिप गट येत असल्यामुळे त्यामुळे चरणराज चवरे यांना या जि.प. गटातून विजय मिळवणे तसे सोपे नसले तरी अशक्य मात्र नाही.

रामदास चवरे हे महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष नामदार राजन पाटील माजी आमदार यशवंत माने यांच्या नेतृत्वाखाली आणि लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील आणि सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले पेनुर मधील युवा नेते आहेत. अत्यंत मृदू स्वभाव, संयमी कार्यशैलीच्या रामदास चवरे यांनी देखील प्रतिस्पर्धी असलेल्या चरणराज चवरे यांच्यावर कधीही टीका टिपणी न करता अत्यंत अजातशत्रु वृत्तीने आणि प्रांजळ भावनेने राजकारण करण्यावर भर दिला आहे. आरक्षण प्रक्रिया होण्याच्या अगोदरपासूनच रामदास चवरे जि.प.ची निवडणूक लढवणार असा विश्वास त्यांच्या समर्थकांना



होता. रामदास चवरे यांच्या प्रचाराची मोठी भिस्त त्यांचे नेते बाळराजे पाटील यांच्यावर अवलंबून आहे. बाळराजे पाटील यांनी या प्रभागातील अनेक गावांना आमदार यशवंत माने यांच्या कालावधीत विविध माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा निधी तर दिलाच. मात्र या भागातील अनेक महत्त्वांच्या रस्त्यांना शेकडो कोटींचा निधी दिल्यामुळे या भागातील दळणवळणाचा प्रश्न राष्ट्रवादीनेच सोडवल्यामुळे लोकांच्या मनात राष्ट्रवादी बद्दल सकारात्मक भावना आहे. साहजिकच बाळराजे पाटील यांचा देखील या जि.प. गटातील अनेक गावात मोठा जनसंपर्क असल्यामुळे बाळराजे त्यांच्या पाठीशी प्रचार यंत्रणेची फौज कशी सक्रिय ठेवणार याबाबत देखील मोठी उत्सुकता आहे.

जनहित शेतकरी संघटनेचे सर्वेसर्वा आणि पाटकुलचे सुपुत्र प्रभाकरभैय्या देशमुख हे देखील याच प्रभागातील अभ्यासू आणि लोकप्रिय नेतृत्व आहेत. ते निवडणूक लढवणार की अन्य कोणती भूमिका घेणार याबाबत देखील मोठे उत्सुकता आहे. याशिवाय कोथाळेचे सुपुत्र आणि काँग्रेस पक्षाचे नेते राजेश पवार हे देखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महाविकास आघाडी कडून ज्येष्ठ नेते मानाजीबापू माने मैदानात उतरले तर ही निवडणूक अप्रत्यक्षरीत्या पंचरंगी होण्याचे दाट संकेत आहेत.

# प्रभाग आठ मधून दौलतराव (बंडू) देशमुख निवडणूक लढवण्यावर ठाम

## येत्या काळातील राजकीय गणिते आणि समीकरणाचा अभ्यास करून पक्ष ठरवणार - दौलतराव (बंडू) देशमुख

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दहा वर्षापासून मोहोळ शहराच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरलेल्या राष्ट्रवादी बरोबर शिवसेनेचेही बारकाईने लक्ष असलेल्या मोहोळ शहराच्या पश्चिम भागातील अत्यंत मोक्याचा आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील असल्याने कायम चर्चेत असलेल्या प्रभाग आठ मधून यावेळी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवून विजयश्री खेचून आणण्याचा दृढ निश्चय मोहोळ शहरातील युवा नेते दौलतराव तथा बंडू देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला



### स्थानिक असल्यामुळे याच प्रभागातून लढणार...

गतवेळच्या निवडणुकीमधील जवळपास सत्तर टक्के प्रभागांमध्ये ज्या त्या प्रभागातील उमेदवारांनी निवडणूक न लढवता अन्य प्रभागातील म्हणजे गेटकेन उमेदवारांनी निवडणूक लढवली. मग यावेळी आमच्या प्रभागातील आरक्षण आमच्या सोयीचे पडल्यामुळे या प्रभागातून हि निवडणूक लढवण्याचा आपण निर्धार केला असून या भूमिकेवर आपण ठाम राहणार आहोत. आमच्या प्रभागातील विविध समस्या गेल्या अनेक वर्षापासून कायम आहेत. याबाबत नगर परिषदेकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला असून नगरसेवकपदी संधी मिळाल्यास या प्रभागाला मोहोळ शहरातील सर्वांगीण विकसित प्रभाग बनवण्याचा आमचा मनोदय असेल.

– **दौलतराव तथा बंडू देशमुख,** भावी नगरसेवक, प्रभाग क्रमांक आठ

आहे. बंडू देशमुख यांनी या प्रभागातून निवडणूक लढविण्याची घोषणा केल्यामुळे मोहोळ शहराच्याच नाहीतर संपूर्ण तालुक्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली आहे. बंडू देशमुख हे निवडणूक लढवणार अशी चर्चा सुरुवातीपासूनच होती मात्र प्रभागाचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर त्यांच्या या निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे.

यावेळी देशमुख म्हणाले की निवडणूक लढवण्याचे निश्चित तर केले आहेच, मात्र निवडणुकीच्या उमेदवारीसाठी पक्ष अजून निश्चित केला नाही. या पुढील काळातील प्रभागातील राजकीय गणिते आणि रणनीती आखुनच आपण या निवडणुकीतील आपली भूमिका निश्चित करू अशीही स्पष्टोक्ती यावेळी देशमुख यांनी अगदी परखडपणे व्यक्त केली.

आजवर सामाजिक क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे कोणतेही पदाबाबतची महत्त्वकांक्षा मनामध्ये न ठेवता सातत्याने पक्षाचा आणि नेतृत्वाचा आदरच करत आलो आहे. मात्र जर आमच्या प्रभागातून निवडणूक लढविण्याची माझ्या समर्थकांची आणि आणि आमच्या प्रभागातील माझ्या कार्यपद्धतीवर विश्वास असलेल्या मतदारांची इच्छा असेल तर मी निवडणूक लढविण्याची इच्छा व्यक्त करणे यामध्ये गैर काय आहे ? असाही सूचक आणि महत्त्वपूर्ण सवाल यावेळी देशमुख यांनी व्यक्त केला.

# प्रभाग सहा मधून निवडणूक लढवण्याचा शरयू आनंद गावडे यांचा निर्धार

## सामाजिक बांधिलकी बरोबर प्रभागातील जनसंपर्काचा होणार मोठा फायदा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एकूणच मोहोळ शहरातील राजकीय वातावरण आता चांगलेच ढवळून निघताना दिसत आहे. मोहोळ शहरातील काही प्रभाग हे राजकीय दृष्ट्या आपली अस्मिता आणि राजकीय समीकरणांची पूर्व वैशिष्ट्ये टिकवून आहेत. अशाच प्रभागापैकी एक असलेल्या प्रभाग क्रमांक सहा मधून शरयू आनंद गावडे या सर्वसाधारण महिला प्रवगार्तून इच्छुक असून त्यांनी निवडणुकीच्या प्रभाग निहाय आरक्षणाची सोडत झाल्यापासूनच निवडणूक लढविण्याच्या पूर्वतयारीला जोरदार प्रारंभ केला आहे. यापूर्वी या प्रभागातील जुन्या म्हणजे प्रभाग क्रमांक तीन मधून अतुल गावडे या गावडे



गत पंचवार्षिक निवडणुकीमध्ये त्यांचे दीर अतुल गावडे हे नगरसेवक म्हणून विजयी झाले होते. प्रभागातील सामाजिक सलोखा जपण्याबरोबर संयमी कार्यशैलीच्या गावडे परिवाराने सर्व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि बंधू-भगिनींचे मन आणि मत जपत राजकीय वाटचाल सुरू ठेवले आहे. पक्ष स्तरावरून अपेक्षित निधी मिळाला नसतानाही स्वखचार्तून अनेक कामे पुर्ण करण्याबरोबर कोविड कालावधीमध्ये फवारणी व धान्य वाटप करत सामाजिक बांधिलकी जपली आहे. दुष्काळी पाणीटंचाईच्या कालावधीत स्वखचार्तून ट्रॅक्टर आणि टँकर खरेदी करत प्रभागातील पाण्याचा प्रश्न सोडविला आहे.

परिवारातील कौटुंबिक सदस्यांनी नगरसेवक पद भूषवले आहे. शरयू आनंद गावडे या मोहोळ शहरातील मूलभूत सुविधा आणि समस्यांचा गाढा अभ्यास असलेले व्यक्तिमत्व आनंद गावडे यांच्या सुविद्य पत्नी आहेत. तर मोहोळ तालुक्याच्या राजकारणामध्ये विविध पदे भूषवत आपले राजकारणातील वेगळेपण जपणारे ज्येष्ठ नेते रामचंद्र तथा रामभाऊ दाजी खांडेकर यांच्या सुकन्या आहेत. त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी महिला क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या चेअरपर्सन असून इतरही महिलाविषयक सामाजिक उपक्रमात त्यांचा हिरहिरीने सहभाग असतो याशिवाय मोहोळ शहरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन महिलांना मार्गदर्शन करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या माध्यमातून भव्य हळदी कुंकू कार्यक्रम त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव भव्य स्वरूपात साजरा केला जातो. इतरही धार्मिक कार्यामध्ये सहभागी होण्याबरोबर प्रत्येकाला सढळ हाताने मदत करण्याचा त्यांचा स्वभाव आहे.


# प्रभाग क्रमांक आठ च्या सर्वांगीण विकासाच्या पाठपुराव्यासाठीच राजकीय क्षेत्रात पदार्पणाचा विचार..

## ७१ फाऊंडेशनचे संस्थापक जिब्राईल शेख यांचा मनोदय

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात मी कार्यरत आहे. अनेक समविचारी आणि सर्व स्तरातील मित्र बांधवांनी सतत उमेदीचे आणि सहकार्याच्या ऊर्जेचे बळ दिल्यामुळेच मोहोळ शहरात विविध उपक्रमाद्वारे सर्वसामान्यांची मी सेवा करत आलो आहे. राजकीय हेतू मनात ठेवून कधीही सामाजिक कार्यात वाटचाल सुरू ठेवली नाही. मी सध्या वास्तव्यास असलेल्या प्रभाग क्रमांक आठ मधील रस्ते पाणी आरोग्य वीज त्याचबरोबर स्वच्छता विषयक सोयी सुविधांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा होणे गरजेचे आहे. त्यासाठी राजकीय क्षेत्राच्या माध्यमातून या प्रभागाचा प्रतिनिधी म्हणून नगरपरिषदेत जाणे आवश्यक ठरते. त्यामुळेच येत्या काळात होणाऱ्या नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मी नगरसेवक पदाची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहे अशी घोषणा प्रभाग क्रमांक आठ मधील नगरसेवक पदाचे प्रबळ दावेदार आणि इच्छुक उमेदवार जिब्राईलभाई शेख यांनी माध्यमांशी बोलताना केली.

गेल्या दहा वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवून ७१ फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही सर्व सहकारी बांधव सक्रिय आहोत. दिव्यांगांना मदत करण्याबरोबर त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही सुरुवातीपासून वचनबद्ध आहोत. वृक्षारोपण असो अथवा रक्तदान शालेय साहित्याचे वाटप, क्रीडापटूंना प्रोत्साहन वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन सुरूवातीपासून करत आलो आहे. दर ७ फेब्रुवारी रोजी असलेल्या माझ्या वाढदिनी कोणतेही पोस्टरबाजी अथवा अनावश्यक खर्च न करता गरजूंना जेवण शाळकरी मुलांना खाऊ वाटप करण्याची आमची परंपरा आहे. पूरग्रस्त भागात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप त्याचबरोबर लॉकडाउनच्या काळात ही सर्वसामान्यांना अत्याआवश्यक वस्तू पुरवण्याचा उपक्रमांने दिलासा देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. केवळ विविध समस्यांचा शासनदरबारी पाठपुरावा करण्यासाठी राजकीय क्षेत्रात पदार्पणाचा माझा विचार आहे.

– **जिब्राईलभाई शेख,** संस्थापक अध्यक्ष ७१ फाउंडेशन मोहोळ.



येत्या काही महिन्यात होणाऱ्या मोहोळ नगरपरिषदेच्या निवडणुकीबाबत उमेदवारीबद्दलची भूमिका स्पष्ट करताना युवानेते जिब्राईलभाई शेख बोलत होते. येत्या काळात प्रभागातील माझ्या संपकार्तील मित्रपरिवार आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या समविचारी बांधवांची बैठक बोलावणार आहोत. सर्वांनी जर मला या निर्णयाबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला तर निश्चितपणे आपण येणाऱ्या काळात होणारी नगरपरिषद निवडणूक लढवणार असल्याची स्पष्टोक्तीही यावेळी प्रभाग क्रमांक आठ मधील नगरसेवक पदाचे प्रबळ दावेदार जिब्राईलभाई शेख यांनी दिली. यावेळी त्यांच्या समवेत त्यांच्या सामाजिक क्षेत्रातील सहकारी मित्र परिवार आणि प्रभाग क्रमांक आठ मधील कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रभाग नऊ मधून निवडणूक लढविण्यासाठी लखनभाऊ कोळी सज्ज

## पाच वर्षापासून सोडवल्या प्रभागातील समस्या प्रशासनाकडे केलेला अविरत पाठपुरावा उपयोगी ठरणार

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ शहराच्या दक्षिण हद्दवाढ भागातील राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असलेल्या प्रभाग नऊ मधून अनेक दिग्गज निवडणूक लढवण्याच्या पूर्वतयारीला लागले आहेत. मात्र ही निवडणूक लागण्यापूर्वी तब्बल पाच वर्षे पूर्वीपासून या प्रभागातील रस्ते, पाणी, आरोग्य व अन्य समस्यांचा अत्यंत बारकाईने अभ्यास करत त्या समस्या नगरपरिषद स्तरावर वेळोवेळी मांडत त्यांचा पाठपुरावा करणारे प्रभागातील युवा नेते लखनभाऊ कोळी यांनी देखील निवडणुकीच्या जणू प्रचाराचा प्रारंभ केला आहे. आरक्षण प्रक्रियेमध्ये प्रभाग नऊ हा सर्वसाधारण महिला आणि ओबीसी खुला असल्यामुळे लखन कोळी हे ओबीसी खुल्या प्रवगार्तून ही निवडणूक लढवणार आहेत.

प्रभागातील विविध राजकीय आणि सामाजिक गणितांचा अभ्यास करत लखन कोळी यांनी अनेक मान्यवरांच्या भेटीगाठी सुरू केल्या



### सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले लखनभाऊ कोळी...

लखन कोळी आणि त्यांच्या परिवारातील सदस्य सातत्याने मोहोळ शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून समाजपयोगी उपक्रम राबवत असतात. त्यामध्ये वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, त्याचबरोबर महर्षी वाल्मिकी कोळी यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य निदान शिबिर, नेत्र उपचार शिबिर, चष्मे वाटप तसेच मोतीबिंदू तपासणी शिबिर या विविध उपक्रमांचा समावेश आहे. दरवर्षी वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चास फाटा देऊन मूकबधिर शाळेमध्ये शालेय साहित्य आणि खाऊ वाटपाचा कार्यक्रम घेण्याबरोबर अनेक गोरगरीब गरजू नागरिकांना ज्येष्ठ नागरिकांना वर्षभर विविध स्वरूपात मदतीचा हात देण्यामध्ये देखील त्यांचा हातखंडा आहे. अशा या सर्व समावेशक युवा नेतृत्वाच्या उमेदवारीमुळे प्रभागाचा विकासात्मक चेहरा मोहरा बदलण्यास वेळ लागणार नाही अशी अपेक्षा प्रभाग नऊ मधील सर्वसामान्य जनतेला आहे.

आहे. प्रभागातील विविध मूलभूत सुविधांबाबत प्रभागातील नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेण्यास प्रारंभ केला आहे. या प्रभागात वास्तव्यास असलेले आणि प्रभागातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी चोवीस तास दक्ष असलेले सामाजिक कार्यकर्ते म्हणून कोळी यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे. शेकडो मित्र परिवाराचे संघटन आणि संघटन कौशल्याच्या माध्यमातून प्रभागाच्या समाजहितोपयोगी उपक्रमासाठी कोळी यांचे सातत्याने योगदान असते. त्यामुळे अल्पावधीतच लखन कोळी यांच्याबाबत प्रभागात सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.

यापूर्वीपासूनच लखन कोळी हे या प्रभागातील विविध समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असल्यामुळे सर्वसामान्यांसाठी धडपड करणारा जीवाभावाचा माणूस म्हणून त्यांची ओळख आजही कायम आहे. त्यामुळे या प्रभागातुन निवडणूक लढवण्यामागची भूमिका मतदारांसमोर विशद करणे त्यांना आता तितकेसे जड जाणार नाही. त्यामुळे लखन कोळी यांची उमेदवारी निश्चितपणे या प्रभागातील निवडणुकीची राजकीय दिशा बदलवू शकते.

## संपादकीय

# महाराष्ट्रात एसआयआर?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीचे सर्व ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचे एक शिष्टमंडळ राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना भेटले. महाराष्ट्रातल्या मतदार यादीतील घोळ त्यांनी चोकलिंगम यांच्या कानावर घातला. या चर्चेच्या वेळी अनेक आक्षेप नोंदवले गेले. त्यावर नेमकेपणाने उत्तर देण्यासाठी चोकलिंगम यांनी वेळ मागून घेतला असून उद्या पुन्हा महाराष्ट्रातील निवडणूक निर्णय अधिकारी या शिष्टमंडळाशी चर्चा करणार आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील मतदार यादीचा घोळ काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय पातळीवरून निदर्शनाला आणला.

कर्नाटकात कशाप्रकारे घोळ झाला याचे तपशीलवार वर्णन त्यांनी दोन पत्रकार परिषदांमध्ये केले. त्याचवेळी त्यांनी महाराष्ट्रातही असाच मोठा घोळ झाल्याचा दावा केला होता. आता विधानसभा निवडणुकीसाठीची जी मतदार यादी अस्तित्वात आहे त्याच यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या गेल्या, तर त्या भाजपलाच अनुकूल ठरतील आणि महाविकास आघाडीला ही यादी नुकसानदायक ठरेल हे अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे महाविकास आघाडीने मनसेला बरोबर घेऊन एकत्रितपणे यावर आवाज उठवला आहे. यात समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिस्ट पक्ष अशा सगळ्या छोट्या पक्षांनाही बरोबर घेतले गेले आहे.

त्यांनी आज एकत्रित म्हणणे सादर केल्यानंतर त्यावर विचार करणे मुख्य निवडणूक अधिकार्यांना भाग पाडले आहे. उद्याच्या बैठकीत ते यावर काय भूमिका घेणार यावर सगळे अवलंबून आहे. महाराष्ट्रात झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर केवळ पाचच महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या. त्यावेळी महाराष्ट्रातील मतदार यादीमध्ये लक्षावधी मतदारांची नावे नव्याने जोडली गेली. हे मतदार इतक्या मोठ्या प्रमाणात कसे वाढले? हा मुख्य आक्षेप आहे. सरासरी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 25 ते 30 हजार मतदारांची वाढ झाल्याचे काहींचे म्हणणे आहे.

देशाच्या अन्य भागात मतदार यादीमध्ये जसा घोळ झाला तसाच घोळ महाराष्ट्राच्या बाबतीतही झाला आहे, एकाच घराच्या पत्त्यावर असंख्य मतदारांची नावे नोंदवली गेली आहेत. दुबार मतदार नाव नोंदणीचा प्रकारही सर्रास घडला आहे. नाव आणि पत्त्यांचाही घोळ आहे. हे सगळे मुद्दे आज मुख्य निवडणूक अधिकार्यांच्या समोर मांडले गेले आहेत. या अपूर्ण आणि चुकीच्या यादीच्या आधारावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्यायला विरोधी पक्षांचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही बिहारप्रमाणे मतदार याद्यांचे विस्तृत फेरतपासणी करणे गरजेचे बनले आहे. बिहारमध्ये अगदी अल्पावधीत हे फेरतपासणी म्हणजेच 'एसआयआर' केले गेले. अगदी घाईघाईने निवडणुकीच्या तोंडावर राजकीय हेतूने मतदार याद्यांमध्ये घोळ घालण्यासाठीच हा उद्योग केला गेला असा सर्रास आरोप झाला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 31 जानेवारीपूर्वी घ्यायच्या आहेत, त्यामुळे अशा प्रकारचा एसआयआर उपक्रम महाराष्ट्रात राबवायला फारच कमी वाव आहे. त्यामुळे या याद्यांची दुरुस्ती हे एक अवघड आव्हान सगळ्यांच्या पुढेच उभे आहे. यावर काय तोडगा निघणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरले आहे. आजच्या घडामोडीत आणखीन एक बाब ठळकपणे समोर आली, तीही की महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता अधिकृतपणे भाजपशी फारकत घेऊन महाविकास आघाडीच्या जवळ आली आहे.

अर्थात, तशी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी मनसेच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीच्या नेत्यांसमवेत मुख्य निवडणूक अधिकार्यांची भेट घेणे हे बर्याच अंशाने सूचक मानले जात आहे. काँग्रेसला बरोबर घेण्यात आमची काही अडचण नाही अशी राज ठाकरे यांची भूमिका असल्याचे शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी अलीकडेच जाहीरपणे नमूद केले आहे. तथापि आमची भूमिका आम्ही स्पष्ट करू आमच्या भूमिकेबाबत तिर्सया नेत्यांनी बोलू नये अशी भूमिका मनसेतर्फे मांडण्यात आली आहे, पण आम्ही काँग्रेसबरोबर जाणारच नाही असे मनसेने म्हटलेले नाही किंवा आम्हाला मनसे अजिबातच नको असे काँग्रेसनेही म्हटलेले नाही.

त्यामुळे मनसेसह महाविकास आघाडी भविष्यात आकाराला येऊ शकते असे आजचे वातावरण आहे. किंबहुना त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाची बाब अशी की मनसे आता भारतीय जनता पक्षाबरोबर नाही हे अगदी स्पष्टपणे समोर आले आहे. राज्यातल्या नव्या राजकीय समीकरणाची ही नांदी आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत हे नवे समीकरण भारतीय जनता पक्षाला आव्हानात्मक ठरणार आहे हे निश्चित. अर्थात, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षा पुढे प्रखर आव्हान निर्माण करायचे असेल, तर आधी मतदार यादीतील घोळ दूर होणे आवश्यक आहे. त्यासाठी या सर्वांनी एकत्रित प्रयत्न हाती घेतले आहेत. हे प्रयत्न किती यशस्वी ठरतील यावर निवडणूक निकालाचे भवितव्य अवलंबून असेल.

# आई-वडिलांना म्हातारपणात एवढी कठोर शिक्षा का?

ज्या आईने आपल्या मुलाला नऊ महिने नऊ दिवस पोटात सांभाळून जन्म दिला. त्याला बोटाला धरून चालायला शिकवले, तो चांगला सक्षम व मजबूत व्हावा म्हणून स्वतःला आटवून त्याला थानाचे दूध पाजले. नंतर सावकाराचे कर्ज काढून व शेतात काबाडकष्ट करून त्याला शिक्षण शिकवले. त्याला उच्चशिक्षित करून नोकरीला लावले. त्यासाठी आई-वडिलांना खूप खूप खस्ता खाव्या लागल्या. मित्रांपुढे, नातेवाईकांपुढे व सावकारांपुढे पैशासाठी हात जोडून त्यांना नतमस्तक व्हावे लागले. वडिलांना सालगडी म्हणून दुसऱ्याच्या शेतात कष्ट करावे लागले. आईला दुसऱ्याच्या शेतात रोजगारी म्हणून जावे लागले. तेव्हा कुठे मुलाला आई-वडिलांच्या जीवावर उच्च शिक्षण शिकून नोकरीला काबीज करता आले. आई-वडिलांच्या जीवावर आपल्या शिक्षणाचा व नोकरीचा डोलारा उभा राहिला, हे आजकालच्या नोकरदार मुलांनी कदापि विसरता कामा नये. परंतु आजकाल नोकरदार मुलांना हे कधी कळणार? आत्ताची मुले लग्न होईपर्यंतच आई-वडिलांसोबत चांगले राहत आहेत. एकदा आई-वडिलांनी लग्न करून दिले आणि पत्नी घरात आली की, तो मुलगा पत्नीच्या स्वाधीन जाऊन पत्नीच्या इशाऱ्यावर चालत आहे. पत्नी जे म्हणेल ते मोकाट्याने ऐकत आहे. आई-वडिलांनी आपल्याला लहानाचे मोठे करून नोकरीला लावले आणि आता त्यांना सुखात व आनंदात ठेवून त्यांच्या उपकाराची परतफेड करणे हे मुलाचे परम कर्तव्य असते. खरे तर आई-वडिलांचे उपकार आपण कधीच फेडू शकत नाही. कारण त्यांनी आपल्याला जन्म देऊन आपल्याला हे सुंदर जग दाखवले आहे. पत्नीच्या धाकात राहून जीवन जगणारे महाभाग खूप आहेत. प्रत्येक स्त्रीला सासूच्या धाकात राहून सासूच्या आदेशाप्रमाणे जीवन जगणे नको वाटते. सासूने आपल्यावर अधिकार गाजवणे त्यांना आवडत नाही. म्हणून आजकालच्या मुलींना सासू-सासऱ्याच्या सहवासात जीवन जगणे नको वाटत आहे. म्हणून त्या मुली सासू पासून अलिप्त राहून जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आपल्या नवरोबाला सासूच्या विरोधात भलतेच काहीबाही लावून देऊन त्या मायलेकरात फूट पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यात भांडण लावून देणे आणि ते भांडण मनसोक्त पाहणे आजकालच्या सुनांचे वाईट धोरण बनले आहे. लग्न झाल्यावर पंधरा ते वीस दिवसच मुले आपल्या आई-वडिलांसोबत राहत आहेत. नंतर सगळा पसारा आवरून नोकरीच्या ठिकाणी किंवा शहरी भागात जाऊन स्थायिक होत आहेत. इकडे आई-वडिलांना वाऱ्यावर सोडत आहेत. कधी बारा महिन्याला गावाकडे आले तर आई-वडिलांना बोलायला देखील तयार नसतात. आईवडील मेले आहेत का जिवंत आहेत? याचे त्यांना काहीही देणे घेणे नसते. फक्त आई-वडील मेल्यावर मातीला येणे आणि लोकांच्या देखत मोठ्याने हंबरडा फोडून धाय मोकलून रडणे हे मात्र त्यांना चांगले जमते. असला नौटंकीपणा काय कामाचा? एका क्लास वन अधिकाऱ्याची माय मोठ्या आजाराने ग्रस्त आहे..ती आता मरणाच्या दारात उभी आहे, कधी मरेल याचा काही भरवसा नाही. तिचे अन्नपाणी पूर्णपणे बंद झाले आहे. तिची वाचा देखील बंद झाली आहे. ती मृत्यूशी झुंज देत आहे. तरी देखील तिचा मुलगा तिच्याजवळ यायला तयार नाही. तो शहरात आपले जीवन आनंदाने जगत आहे. आपली आई शेवटची घटका मोजत आहे आणि ती आता काही दिवसच जगणार आहे, आपण तिच्याकडे जाऊन तिची सेवा करावी, तिला जीव लावावा, असे त्या अधिकाऱ्याला वाटत नाही. एक तर आई-वडिलांना शहरी भागात आपल्याजवळ ठेवायचे नाही आणि ती मृत्यूशी झुंज देत असताना तिच्याजवळ जायचे नाही. मेल्यावर मात्र मोठमोठ्याने रडायचे, तिची तेरवी व पुण्यतिथी जोरात साजरी करायची आणि गाव जेवण देऊन मोकळे व्हायचे. आई-वडिलांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून अस्थी गंगेला अर्पण करायच्या आणि आई-वडिलांसाठी मी खूप काही केले असे सांगत फिरायचे. हे असे कसे चालणार हो? आई वडील मेल्यावर आई-वडिलांचे महात्मे सांगत फिरण्यापेक्षा जिवंतपणीच आई-वडिलांना जीव लावा..मेल्यावर तेरवी, पुण्यतिथी किंवा इतर कार्यक्रम करण्यापेक्षा जिवंतपणीच खूप खूप जीव लावून त्यांची सेवा करावी...त्यांना आपल्या सहवासात ठेवावे...पत्नीचे ऐकून आई-वडिलांना अंतर देऊ नये...आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवावी.. आई-वडिलांनी आपल्याला दिलेला जन्म, लहानाचे मोठे केलेले दिवस, आपल्याला खूप खूप कष्ट करून शिकवलेले शिक्षण हे कदापी विसरता कामा नये. आई वडिलांना आपल्या कातड्याचे जोडे जरी करून शिवले तरी आई-वडिलांचे उपकार कधीच फिटू शकणार नाहीत..हे आमच्या युवकांनी लक्षात घेणे काळाची गरज आहे. आई-वडिलांनी आपल्याला जन्म देऊन काय गुन्हा केला नाही. त्यांना म्हातारपणात एवढी कठोर शिक्षा का देता? त्यांना का वृद्धाश्रमात पाठवता? म्हातारपणात त्यांना का अंतर देता? या प्रश्नांचा प्रत्येक विवाहित मुलांनी विचार करून स्वतःचे आत्मपरीक्षण करावे, असे मला वाटते....

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

**प्रबोधन**

# संशयीवृत्तीचे दुष्परिणाम !

संशयात्मा विनश्यंति -अर्थात, संशयी माणसाचा नाश होतो, असं एक वचन देवधर्माभिमानी महापुरुष नेहमी वापरतात. देव ही असत्य कल्पना आणि धर्माची शोषण वृत्ती संशय घेण्याने उघडी पडेल म्हणून लबाड भटोबांनी हे वचन प्रसारित करून दृढमूल केलं आहे. भटोबा हिंदू असो वा मुस्लीम-बौद्ध- ख्रिश्चनादि धर्मी असो; असत्याच्या स्थैर्यासाठी धर्मग्रंथांत माणसांना संशयरहित मनाने खोट्याला खरं म्हणण्याचा आग्रह कानीकपाळी ओरडून सारखाच सांगितला आहे. बायबलच्या नवा करारमध्ये जो संशयी आहे तो नरकात पडतो (He that doubteth is damned) असं म्हटलं आहे.

पण जगाची भौतिक प्रगती विज्ञानाने आणि विज्ञानसदृश शास्त्रांचा विकास संशयजन्य, संदेहजन्य विचारातूनच झाला आहे. सिसरो म्हणतात, 'By doubting we come at the truth.' अर्थात, संशय घेण्यामुळेच आपण सत्यापर्यंत पोहोचतो. विवेकानंद म्हणतात, 'जे सिद्धान्त धर्म सांगतो त्यांचे परीक्षण बुद्धीच्या कसोटीवर व्हावयास पाहिजे.' विशेष म्हणजे, बुद्धिवर्धक कसोट्या नेहमीच संशयजन्य असतात. स्टॅनिसलॉस म्हणतात, 'खात्रीलायक विश्वास ठेवायचा असेल तर संशय घेण्यापासून सुरुवात केली पाहिजे.'

'प्रत्येक गोष्टीचा संशय घ्या' (Doubt all things) असं डेकाते सुद्धा म्हणाले असले तरी त्यांनी हा उपदेश ज्ञानसाधकांना केला आहे, हे आपण समजून घेतलंच पाहिजे. व्यासपीठ आणि घर यात फरक असतो. अन्यथा सत्य घरात शोधण्यासाठी संशय घेणाऱ्यांना घर बरबाद करूनच सत्यापर्यंत पोहोचावं लागतं. किंवा कुटुंबियांना पदरात पडलं पवित्र झालं अशा बुद्धीने संशयनिवृत्ती साधून घर चालवावं लागतं. क्षमाशील, उदार तोडून बाहेर पडतो, म्हणून तोच आदर्श अंतःकरणाचा माणूसच संशयाचं जाळं गृहस्थाची पात्रता प्राप्त करतो.

पण दुर्दैवाने संशयी कुटुंबपालक गृहस्थांची संख्याही मोठी आहे, हे सामाजिक दुखणं आहे. आपण संशयी आहोत हेसुद्धा या दीडशहाण्यांना कळत नाही. पूर्वी नवरे-बायकोच्या चारित्र्याचा संशय जानाति कुतः मनुष्यः?' असा प्रश्न अगतिकपणे घेत. 'स्त्रियश्चरित्रम पुरुषस्य भाग्यं देवो न ते विचारीत. (अर्थात, त्यांच्या मते, स्त्रियांचं चारित्र्य हे न कळणारं असतंच.) आणि नवरेगिरी गाजवताना पत्नीचा हरघडी संशय घेत. पण अलीकडे स्त्रियासुद्धा पुरुषांच्या चारित्र्याचा संशय राजरोसपणे घेत आहेत. लग्नानंतर अंकुरित होणारा हा संशय पाहाता पाहाता भला मोठा वृक्ष होतो आणि त्याचं समूळ खंडन करणं कठीण होऊन बसतं. संशयी वृत्तीने संसार विधायक मार्गावरून चालला तर ठीकच आहे. पण तो भरकटला तर मात्र बायको-मुलं आणि गृहस्थ साऱ्यांची वाटच लागते. नवऱ्याने बायकोचा खून करणं, बायकोने मुलं घेऊन विहिरीत उडी मारून मरणं किंवा जन्माला आलेलं अपत्य आपलं नसेलच म्हणून त्या अश्राप जीवाला ठार करणं अशा दुर्दैवी घटना नक्की घडतात. मानसशास्त्रानुसार, संशय ही विकृती आहे. पण हे सत्य किती लोकांना माहीत आहे? बुद्धिनिष्ठ संशय हा सर्जनच्या सुरीसारखा हितकारक असतो; तर भावनिक संशय हा विकृत आणि गुंडाच्या हातातील नंग्या तलवारीसारखा घातक असतो.

भावनिक किंवा निर्बुद्ध संशयाने एकदा बादशहा अकबराचं खूप नुकसान केलं. झालं असं की, त्यांच्याकडे दोन अत्यंत शूर माणसं नोकरी मागण्यासाठी आली. 'आम्ही शूर आहोत, आम्हाला फौजेत जागा द्या' असं ते म्हणताच बादशहा उद्गारले, 'कशावरून तुम्ही शूर आहात?' आपल्या पराक्रमाबद्दल बादशहाने संशय घ्यावा, हे त्या दोघांनाही असह्य झालं. दोघांनी आपल्या तलवारी उपसल्या. द्वंद्वयुद्धाचा पवित्रा घेतला आणि एकमेकावर हल्ला केला. क्षणात दोन शूर माणसं एकमेकांच्या छातीत तलवारी खुपसून मरून पडली. लाखमोलाची माणसं अकबराने कवडीमोल संशायापोटी गमावली. म्हणून-

संशयीपणाचे। होऊ नका बळी
संशयाच्या वेळी। धीराने घ्या ॥ १
बुद्धीने जिंकावे । संशयाचे युद्ध
सात्त्विक, विशुद्ध । स्वतः व्हावे ॥२
गुणदोष सर्वा । ठायी वसतात
स्त्री-पुरुषात । सारखेच ॥ ३
थोड्या चुकीसाठी । नको शिक्षा घोर
करा मन थोर । आपुलेच ॥४
क्षमाशस्त्र सदा । वापरा जयी व्हा
जीवनास न व्हा । पाठमोरे ॥५
चारित्र्याचे व्हावे। आदर्श आपण
सन्मार्गावरून । चालूनिया ॥ ६
आदर्श पाहूनी । प्रमादी थांबती
जीवनाची भक्ती। खरी हीच ॥७
संशयनिवृत्ती । बुद्धीने साधावी
वृत्ती आततायी । विनाशक ॥८
सात्त्विक संशय । कर्मठ संशय
आदर्श संशय । बाळगावा ॥९
आपण तरावे । इतरां तारावे
मूळ न उरावे। संशयाचे ॥। १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# चारचाकी वाहनांसाठी MH-13 EX मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चारचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या MH-13 EX मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यासोबतच दुचाकी वाहनांसाठीही आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

वाहनांची नवीन मालिका सुरु होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयात होणारी गर्दी टाळण्यासाठी ही पूर्वनियोजनात्मक प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नागरिकांना हवा असणारा पसंतीचा क्रमांक सुलभतेने मिळावा, यासाठी विहीत शुल्क भरून अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**अर्ज सादर करण्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रेः**

दिनांक 16 ऑक्टोबर 2025, सकाळी 11.00 ते सायं. 4.00 या वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा.

अर्जासोबत क्र.16 अन्वये जारी केलेला डीडी, पत्त्याचा पुरावा, आधार लिंक झालेला मोबाईल क्रमांक, ओळखपत्र, पॅनकार्ड याच्या साक्षांकित प्रती अनिवार्य आहेत.

- डीडी फक्त "Dy R.T.O. SOLAPUR" यांच्या नावे नॅशनलाइज/शेड्यूल्ड बँकेचा असावा.

**लिलाव प्रक्रियाः**

एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी 16 ऑक्टोबर 2025 रोजी सायं. 5.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल.

यादीतील अर्जदारांनी 17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 2.00 वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात लिलावासाठीचा डीडी सादर करावा.

लिलावासाठीचा डीडी रु. 300/- पेक्षा जास्त रकमेचा असावा.

17 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 4.00 वाजता, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत लिफाफे उघडून सर्वाधिक रक्कमेचा डीडी सादर करणाऱ्या अर्जदारास पसंतीचा क्रमांक वितरीत केला जाईल.

**महत्वाचे निर्देशः**

- एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलता येणार नाही.
- राखीव क्रमांकासाठी अर्ज केल्यानंतर 180 दिवसांच्या आत वाहन सादर करून नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल.
- कोणत्याही परिस्थितीत राखीव क्रमांकासाठी दिलेली फी परत करता येणार नाही किंवा समायोजन करता येणार नाही.

**MH-13 EX मालिकेचे वेळापत्रक (चारचाकी वाहनांसाठी):**

- 16 ऑक्टोबर 2025 - तिप्पट शुल्काचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्वीकृती (वेळः सकाळी 11 ते सायं. 4)
- 16 ऑक्टोबर 2025 - सायं. 5.00 वा. डबल आलेल्या अर्जांची यादी जाहीर
- 17 ऑक्टोबर 2025 - दुपारी 2.00 पर्यंत लिलावासाठीचे डीडी सीलबंद लिफाफ्यात स्वीकृती
- 17 ऑक्टोबर 2025 - दुपारी 4.00 वाजता लिलाव प्रक्रिया

प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी नागरिकांना या प्रक्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**
**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**
**पत्ताः** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

## वात्रटिका

### हा(आ) योग आहे.

निवडणूक आली की
आयोगाशी येते वाकडे...
एकजूट करून नेत्यांनी
यावेळी घातले साकडे...
घडून गेले तेच पुन्हा
आणि पुढे घडू नये...
पुन्हा पुन्हा एकाचेच
खुर्चीवर प्रेम जडू नये...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568

पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# रस्ते व पुलांच्या दुरावस्थेबाबत राज्यमंत्री बोर्डीकर यांची खा.पाटील यांनी भेट घेतली

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघातील माळशिरस,माण, पंढरपूर, माढा तालुक्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग विकास महामंडळ (एमएसआरडीसी) अंतर्गत येणाऱ्या रस्ते व पुलांच्या खराब स्थितीबाबत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम) मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांची भेट घेतली.



भेटीदरम्यान खासदार मोहिते पाटील यांनी मतदारसंघातील अनेक प्रमुख रस्त्यांवर आणि पुलांवर अपूर्ण प्रकल्प, दुरुस्तीची कमतरता याबाबत सविस्तर माहिती राज्यमंत्र्यांसमोर मांडली. त्यांनी सांगितले की, या दुरावस्थेमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो, अपघातांची शक्यता वाढते आणि प्रवासात अनेक अडचणी येतात.

# विद्यार्थ्यांनी अकलाई मंदिर परिसराची साफसफाई केली

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाच्या डी. फार्मसी च्या द्वितीय वषार्तील विद्यार्थ्यांनी अकलूज गावचे ग्रामदैवत अकलाई देवी मंदिर परिसराची साफसफाई केली. ही स्वछता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत घेण्यात आले होते.विद्यार्थीनी मंदिर परिसराची स्वछता करून नीरा नदीच्या काठावरील स्वछता करण्यात आली.




या दरम्यान विद्यार्थ्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्व समजून सांगण्यात आले व आपण आपला परिसर स्वतःच स्वच्छ ठेवावा याबाबत मार्गदर्शन केले.स्वछता करत असताना विद्यार्थ्यांच्या आरोग्याची देखील काळजी महाविद्यालयच्या अध्यापकांकडून घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी "स्वच्छ भारत,स्वस्थ भारत" अश्या घोषणा देऊन स्वच्छता अभियानाची सांगता झाली.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस मंदिर समितीकडून 1 कोटीची मदत जमा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विविध भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात शेत पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व देवस्थानांना केले होते.

या आवाहनास प्रतिसाद देत तसेच सामाजिक उत्तरदायित्व व मानवतावादी भूमिकेतून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने शासनाची मंजुरी घेऊन मुख्यमंत्री सहायता निधीस एक कोटी रुपयाच्या मदतीचा धनादेश दिनांक 14 ऑक्टोबर रोजी मंत्रालय येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जमा केल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.




यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार अभिजीत पाटील, मंदिर समितीच्या सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ॲड माधवीताई निगडे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, अतुल शास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.

# प्रा.शिवशंकर गायकवाड यांनी रसायनशास्त्र विषयात पीएच.डी.प्रदान

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर येथील रसायनशास्त्र विभागातील सहा. प्राध्यापक शिवशंकर गेनदेव गायकवाड यांनी 'सिंथेसिस अँड कॅरेक्टरिझेशन ऑफ स्किप बेस ट्रांझिशन मेटल कॉम्प्लेक्सेस अँड देअर बायोलॉजिकल एप्लीकेशन' या विषयावर पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. ही पदवी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक कॅप्टन डॉ. सुरेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपादन केली आहे.प्रा. गायकवाड हे यापूर्वी सेट, नेट आणि गेट या राष्ट्रीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.



या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य सहकार परिषद, पुणे यांचे अध्यक्ष ना.राजन पाटील, संस्थेचे अध्यक्ष मा. बाळराजे पाटील, सचिव तथा सिनेट सदस्य मा. अजिंक्यराणा पाटील, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत सूर्यवंशी, विविध शाखेचे मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी अभिनंदन केले.

# पंढरपूर येथे दिव्यांग बालकांसाठी विशेष शिबीराचे आयोजन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एम. एस. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, पी. पी. पेठकर यांच्या सहकार्याने पंढरपूर तालुका विधी सेवा समिती व अधिवक्ता संघ, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० नवजीवन निवासी अपंग शाळा, के.बी.पी. कॉलेज चौक, बायपास रोड, पंढरपूर येथे दिव्यांग बालकांसाठी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश. ए. एस. सलगर यांनी दिली.

या विशेष शिबीरामध्ये तालुक्यातील दिव्यांग बालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार असून, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ. दिपक धोत्रे यांचे मार्गदर्शनाखाली तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग बालकांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे याबाबत माहिती देण्यात येणार आहे. दिव्यांग बालकांसाठी असणाऱ्या योजनांचा तात्काळ लाभ मिळावा यासाठी शिबीराच्या ठिकाणी ऑनलाईन फॉर्म भरून घेण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

तालुक्यातील दिव्यांग बालक यांच्या पालकांनी आवश्यक कागदपत्रांसह नवजीवन निवासी अपंग शाळा, के.बी.पी. कॉलेज चौक, बायपास रोड, पंढरपूर येथे उपस्थित राहून शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ए. एस. सलगर यांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र.अभि/कावि नं.२९/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. विठ्ठल साधु चवरे,वय - ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. पेनूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर }**अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रामपंचायत पेनूर,ता.मोहोळ,(अर्जाचीनोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत पेनूर, यांचेवर बजावविण्यात यावी.) }**सामनेवाला**


ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची मुलगी म्हणजे श्रेया विठ्ठल चवरे हिचा जन्म ता. ०५/०१/२०१८ रोजी मौजे पेनूर, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची मुलगी म्हणजे श्रेया विठ्ठल चवरे हिचा जन्म दाखल्याची ता. ०५/०१/२०१८ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जानेवारी २०१८ चे अभिलेखात अर्जदाराची मुलगी म्हणजे श्रेया विठ्ठल चवरे हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ३०/१०/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.१५/१०/२०२५

**हुकूमावरुन**

**लिपीक** (शिक्का) **तहसीलदार मोहोळ सोलापूर**

# उडान फाउंडेशनकडून अतिवृष्टी व आत्महत्याग्रस्त कुटुंबास ३१,००० रुपयांची आर्थिक मदत

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** उडान फाउंडेशनच्या वतीने मोहम्मद पैगंबर कर्तव्य निधी अंतर्गत अतिवृष्टीमुळे पुरात वाहून गेलेल्या आणि आत्महत्या केलेल्या कुटुंबास रोख स्वरूपात ₹३१,०००/- आर्थिक मदत प्रदान करण्यात आली. या मदतीचा उद्देश अशा संकटग्रस्त कुटुंबांना मानसिक व आर्थिक आधार देणे हा आहे.



या मदत वितरण प्रसंगी उडान फाउंडेशनचे अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष जाफर शेख, सचिव जमील खान, सल्लागार युन्नूस शेख, कार्याध्यक्ष शकील मुलानी, तसेच जाणीव फाउंडेशनचे अध्यक्ष तुळशीदास मस्के, साजन शेख, गणेश गोडसे, ॲड. रियाज शेख, वसीम पठाण, मोहसीन पठाण, सादिक काझी, शोहेब काझी, शहाबाज मुलानी, पांगरीचे माजी सरपंच विलास लाडे, वैरागचे नगरसेवक वैजिनाथ आदमाने, रियाज बागवान, वसीम मुलाणी, शोहेब सय्यद, रॉनी सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत उडान फाउंडेशनने गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.

# पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीसाठी 16 ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्तांची VC बैठक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाने दिनांक 01 नोव्हेंबर 2025 या अर्हता दिनांकावर आधारित पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार 30 सप्टेंबर 2025 रोजी मतदार नोंदणी नियम 1960 चे कलम 31(3) व 31(4) अन्वये जाहिर सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे विभागातील सर्व पात्र मतदारांची नोंदणी सुनिश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग यांच्यातर्फे VC द्वारे बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता होणार असून, यामध्ये शासकीय अधिकारी, शिक्षण संस्था, वैद्यकीय, विधी, अभियंता, बँका व इतर व्यावसायिक नोंदणीकृत संस्था/संघटना यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील संबंधित विभाग प्रमुखांनी VC बैठकीसाठी दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 10.15 वाजेपर्यंत नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, श्क्ढ कक्ष, सोलापूर येथे उपस्थित राहावे, अशा सूचना संबंधित पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

**VC बैठक तपशील:**

- दिनांक: 16 ऑक्टोबर 2025
- वेळ: सकाळी 10.15 वा.
- ठिकाण: नवीन जिल्हाधिकारी कार्यालय, VIP कक्ष, सोलापूर

सदर माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी, गणेश निऱ्हाळी यांनी दिली आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

सचिदानंद दत्तात्रय थिटे
रा. शिरापूर मो ता.मोहोळ जि. सोलापूर }**अर्जदार**

**विरूद्ध**

ग्रापंचायत शिरापूर मो ता. मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार सचिदानंद दत्तात्रय थिटे जन्म दि. ५/१०/१९८४ रोजी शिरापूर मो ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला सचिदानंद दत्तात्रय थिटे यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑक्टोबर १९८४ चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.३०/१०/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. १५/१०/२०२५

**हुकूमावरुन**

**लिपीक** (शिक्का) **तहसीलदार मोहोळ सोलापूर**

# सहकार महर्षी साखर कारखान्यावतीने कामगारांना दिपावली सणासाठी बोनसचे वाटप

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यातील कामगारांना दिपावली सणासाठी १०% प्रमाणे बोनस वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम कारखान्याच्या संचालिका कु.स्वरूपाराणी जयसिंह मोहिते- पाटील यांचे शुभहस्ते व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटीचे संचालक चि.सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील स्मृतिभवन येथे संपन्न झाला.



सहकार महर्षि कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील (माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) तसेच कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना कर्मचारी यांचे करिता विविध उपक्रम व आरोग्य सेवा योजना राबविल्या जातात.त्याच अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमामध्ये कारखान्याचे एकुण १९ विविध विभागाकडील जेष्ट कर्मचारी यांना बोनस पत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरवातीस कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षि कै.शंकरराव मोहिते-पाटील व आक्कासाहेब यांचे प्रतिमेचे पूजन कारखान्याचे जेष्ट कामगार विश्वास कोरटकर यांचे शुभहस्ते करण्यात आले.या कार्यक्रमासाठी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र केरबा चौगुले यांनी केले त्यामध्ये त्यांनी साखर उद्योग व कामगार यांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी कामगार संचालक रणजित रणनवरे यांनी कारखाना व्यवस्थापन कामगारांना कायम स्वरूपी वेळेत पगार तसेच बोनस देत असून कामगारांसाठी सेवा सुविधा देऊन विविध उपक्रम राबवित असल्याचे सांगून कामगार व त्यांचे कुटुंबियांचे हित जोपासले जात आहे. त्याबद्दल सर्वांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. व्यवस्थापनाने दिलेल्या जबाबदा-या कर्मचारी पार पाडतील अशी ग्वाही दिली.कारखान्याने कामगारांना १०% प्रमाणे बोनस दिल्याने कामगारांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. याकार्यक्रमा करीता कारखान्याचे सेक्रेटरी व इतर सर्व खातेप्रमुख, विभागाप्रमुख,सर्व कामगार व युनियन प्रतिनिधी इ. मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

# श्री सिद्धेश्वर प्रशाला साखर कारखाना कुमठे च्या मुलींच्या खो खो स्पर्धेत विजयी

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या 17 वर्षे वयोगट शहर स्तरीय खो-खो स्पर्धेत श्री सिद्धेश्वर प्रशालेच्या मुलींचा संघ सलग दुसऱ्या वर्षी विजयी ठरला आहे.या संघाची विभागीय स्तरावर निवड झाली आहे

सदर संघाचे कर्णधारपद तस्मिया पटेल हिच्याकडे होते. सुप्रिया चाबुकस्वार, मयुरी सोनकडे, श्रद्धा चाबुकस्वार, धनश्री हिरेमठ,सना शेख, श्रेया होनराव, प्राची सुकंद,जबीन मुल्ला, राधिका शिवशरण, मोहिनी सोनकडे,आनंदी ढोणे, कोमल जडगे, श्रावणी पटणे, श्रुती रामशेट्टी या मुलींच्या संघाने ही कामगिरी केली.

या घवघवीत यशाबद्दल यशस्वी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक सिताराम भांड व सहाय्यक क्रीडा शिक्षक गौरीशंकर कोनापुरे यांचे सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनअण्णाराज काडादी, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सिद्धाराम चाकोते , गुरुराज माळगे, शिवशंकर बिराजदार, समीर सलगर श्री सिद्धेश्वर शिक्षण संकुलाचे समन्वयक संतोष पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक काशिनाथ आकाशे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक महासिद्ध मेसे व प्रशालेतील सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# अनगर नगरपंचायत, अनगर,

**ता.मोहोळ, जि.सोलापूर पिन-४१३२१४**

**स्थापना - ०१/११/२०२१**

**दुरध्वनी क्रमांक : ०२१८९-२४८५२३** Email ID: comcangar7@gmail.com

जा.क्र.पापु/६५७/२०२५ दिनांक १५/१०/२०२५

## शुद्धिपत्रक

अनगर नगरपंचायत अनगर यांच्या वतीने १५ वा वित्त आयोग बंधनकारक निधी तसेच नगरपंचायत फंड अंतर्गत निविदाधारक यांच्याकडून कामाकरिता ऑफलाईन निविदा मागविण्यात येत असल्याची जाहिरात दैनिक कटूसत्य च्या अंकात दिनांक १५/१०/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात अली. त्यामध्ये कामाची अंदाजित किंमत हि चुकून ५०,००,०००/- झाली असून ती रक्कम ५,००,००० अशी वाचावी याची सर्वांनी नोंद घ्यावी

(शिक्का: स्थापना ०१/११/२०२१)

**सही/-**
**(सुरेश भदर)**
**मुख्याधिकारी**
**अनगर नगरपंचायत, अनगर**

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 79

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 5 | | 8 | 4 |
| | | 1 | 9 | | 6 | | | |
| | 4 | 9 | 7 | 2 | | 6 | | 3 |
| | | 5 | 2 | | 9 | | | |
| 9 | 2 | | 4 | 7 | | | | 1 |
| | 6 | 3 | 5 | | 1 | | 2 | |
| 1 | | | 6 | | | | | 2 |
| | 8 | 4 | | 5 | | | 9 | 6 |
| | 9 | 6 | | 1 | | 7 | | 5 |

# विविध विकास कामांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघातील विविध विकास कामांबाबत, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले.

कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपुर येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांच्या पुणार्कृती पुतळा अनावरण सोहळा व १०००० मे.टन विस्तारीकरण गाळप व पोटॅश निमार्ती प्रकल्पाचा शुभारंभ कार्यक्रम, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळेस सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी माढा लोकसभा मतदारसंघातील खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्हा व माढा लोकसभा कार्यक्षेत्रातील विकासाच्या विविध प्रस्तावांबाबत निवेदन सादर केले.

निवेदनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :

मोडनिंब येथे गतिशक्ती मल्टी



मॉडेल कार्गो टर्मिनल विकसित करणे यामुळे मध्य रेल्वे सोलापूर विभागातील मोडनिंब स्थानक हे भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, तेथे GCT उभारल्यास औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

जीआयएस व जनरेटिव्ह एआय आधारित शेतकरी केंद्रित सिंचन व्यवस्थापन पायलट प्रकल्प उजनी धरण प्रकल्प क्षेत्रात राबविणे. या प्रणालीद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर, पिकानुसार सिंचन नियोजन व उत्पादनवाढ साध्य होईल.

मौजे शेलगाव (वां), ता. करमाळा येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करणे. सोलापूर जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान व संशोधनाचा लाभ मिळावा यासाठी हा उपक्रम.

केळी हे पीक 'भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत' समाविष्ट करण्याची मागणी. शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य व संरक्षण मिळावे यासाठी ही विनंती करण्यात आली.

तीर्थक्षेत्र देहू - पंढरपूर दरम्यान नवीन मेमू रेल्वेगाडी सुरू करणे.भाविक व यात्रेकरूंसाठी हा मार्ग सोयीचा ठरावा म्हणून केंद्र शासनाकडे पाठपुरावा.तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) अंतर्गत नीरा-देवघर प्रकल्पासाठी निधी मिळविण्यासाठी PIB कडे पाठपुरावा.

प्रलंबित पंढरपूर-लोणंद व जेऊर-आष्टी रेल्वे प्रकल्प तातडीने पूर्ण करणे.ग्रामीण भागातील संपर्क सुविधा वाढविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे.

आंतरराष्ट्रीय डेफ (श्रवण अपंग) खेळाडूंना रोख रक्कम प्रोत्साहन धोरणाचा लाभ देणे. श्रवण अपंग खेळाडूंचे मनोबल वाढविण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर हा निर्णय आवश्यक आहे असे निवेदन सादर केले.

# पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात सीबीजी उत्पादन प्रकल्पासाठी केंद्राकडे पाठपुरावा करू - मुख्यमंत्री





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने सीबीजी प्रकल्प उभा करण्यासाठी प्रयत्न करावा. केंद्र सरकार देशातील 15 साखर कारखान्यांना यासाठी मदत करणार असून त्यात या कारखान्याचा समावेश व्हावा यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर (ता. माळशिरस) येथे सुधाकरपंत परिचारक यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण, कारखान्याच्या 10 हजार टन विस्तारीकरण गाळप, पोटॅश निर्मिती प्रकल्पाच्या शुभारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, कारखान्याचे चेअरमन माजी आमदार प्रशांत परिचारक आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने 10 हजार मे.टन प्रति दिन गाळप क्षमता गाठली आहे आणि पोटॅश उत्पादन सुरू केले आहे. शेतकऱ्यांना योग्य एफआरपी आणि इतर सुविधा देण्याचे काम कारखान्याने केले आहे. इथेनॉल करताना निर्माण होणाऱ्या उपउत्पादनातून सीबीजीसारखे अतिशय स्वच्छ इंधन तयार करता येते. साखर उत्पादनात आतापर्यंत टाकाऊ समजल्या जाणाऱ्या बाबी उत्पन्नाचे साधन ठरत आहेत. त्यामुळे कारखान्याने सीबीजी प्रकल्प उभा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना श्री.फडणवीस म्हणाले, त्यांच्यासोबत काम करण्याची आणि त्यांच्यासोबत विधानसभेत काम करण्याची संधी मिळाली. समाजात अशाप्रकारचे निस्पृह नेते फार थोडे पहायला मिळतात, स्वतःच्या कर्तृत्वाने त्यांनी मोठेपण मिळविले. त्यांना सर्व मोठे मालक म्हणत असले तरी पंढरीच्या पांडुरंगाला मालक समजून सेवेकऱ्याच्या भावनेने त्यांनी आजन्म सामान्य माणसाची सेवा केली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित जनसमुदाय हे मोठ्या मालकांनी कमावलेले प्रेम आहे. ज्यांची सत्ता समाजाच्या मनावर असते ती कायम टिकते, म्हणूनच सर्वजण त्यांच्या प्रेमापोटी आले, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, प्रत्येकाशी त्याच्या भाषेत संवाद साधणारे त्यांचे शिस्तप्रिय, कणखर व्यक्तिमत्व होते. सामान्यातल्या सामान्य माणसाची सेवा करण्याचे कार्य त्यांनी केले. अनेक संस्था उभ्या करून या संस्थांना त्यांनी नेतृत्व दिले आणि विश्वस्ताच्या भावनेतून कार्य केले. प्रत्येक संस्था सचोटीने चालविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचा स्पर्श लाभलेल्या संस्था यशस्वी ठरल्या आहेत. अत्यंत संवेदनशीलतेने समाजात परिवर्तन घडविणारी प्रत्येक संस्था त्यांनी उभी केली, त्यात पारदर्शकता आणली आणि त्यातून सामान्य माणसाचे कल्याण साधले. जीवनाच्या अखेरपर्यंत कर्तव्यभावनेने त्यांनी कार्य केले. राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर एसटी फायद्यात येऊ शकते हे त्यांनी दाखवून दिले. त्यांच्यासोबत काम करताना आपले जीवन समृद्ध झाले, अशा शब्दात श्री.फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राज्यात पूरग्रस्त आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत करण्यासाठी वेगाने कार्यवाही करण्यात येत असल्याचेही फडणवीस म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिचारक यांनी केले. कै. सुधाकरपंत परिचारक यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेसाठी आपले आयुष्य वेचले. जिल्ह्यात हरितक्रांती करण्यासाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत प्रयत्न केले. समाजासाठी सर्वकाही अर्पण करणारे त्यांचे जीवन इतरांसाठी आदर्शवत होते. नागरिकांच्या इच्छेखातर त्यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आल्याचे ते म्हणाले. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे 20 हजार सभासद असून कारखाना नफ्यात आहे. आज 10 हजार मे.टनाचा टप्पा कारखान्याने गाठला असल्याची माहिती त्यांनी दिली. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्यावतीने मुख्यमंत्री निधीसाठी एक कोटी रुपयांचा धनादेश फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

कार्यक्रमास राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, नारायण पाटील, दिलीप सोपल, बाबासाहेब देशमुख, राजू खरे, माजी खासदार रणजीत नाईक निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, शहाजी पाटील, दीपक साळुंखे, संजय शिंदे, राजेंद्र राऊत, साखर कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्यासह उमेश परिचारक, लोकप्रतिनिधी, कारखान्याचे सभासद, नागरिक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी बार्शी बाजार समितीचा मोठा पुढाकार

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टीमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रुपये १ कोटींचा धनादेश सुपूर्त करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे हा धनादेश सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे साहेब आणि माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी सुपूर्द केला. या निधीचा उपयोग अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी करण्यात येणार आहे.

राज्यभरातील अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतजमिनींचे, पिकांचे आणि जनावरांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्य सरकारच्या वतीने मदतकार्य सुरू असतानाच,



स्थानिक पातळीवरून मिळणाऱ्या या योगदानामुळे शासनाच्या मदतीला अधिक बळ मिळणार आहे.

दरम्यान, बार्शी तालुक्यातील समाजातील विविध घटकांनीही या कार्यात सहभाग घेतला आहे. समाजसेवी संस्था, डॉक्टर, उद्योजक, व्यापारी तसेच विविध संघटना यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी स्वयंस्फूतीर्ने देणग्या दिल्या आहेत.

आजपर्यंत बार्शी तालुक्यातून एकूण रुपये १,२९,०३,२११ इतकी रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी जमा करण्यात आली आहे, ही बार्शीच्या लोकांच्या संवेदनशीलतेची आणि शेतकऱ्यांप्रती असलेल्या आत्मीयतेची प्रचीती देणारी बाब ठरली आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात एकजुटीने उभे राहण्याचे आणि मदतकार्य सातत्याने सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

# जनतेची सुरक्षा हीच आमची दिवाळी : सपोनि महारुद्र परजणे

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** कोणताही सण, उत्सव असला तरी पोलीस कुटुंबापासून दूर राहून कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम करत असतात.दीपावली सण हा जवळ आलेला आहे बाहेरगावचे ऊसतोड मजूर हे आपल्याकडे आलेले आहेत.अजून कारखाने सुरू झालेले नाहीत. त्यामुळे दाग दागिने, रोख रक्कम व शेळी बोकड चोरी होण्याचे प्रमाण वाढलेले दिसत आहे.नातेपुते पोलिसांनी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेविषयक विविध उपाययोजना केल्या असून जनतेची जनतेची सुरक्षा हीच आमची दिवाळी असल्याचे मत नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते पोलीस ठाणे येथे पोलीस पाटील यांच्या घेण्यात आलेल्या बैठकीदरम्यान बोलत होते. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नातेपुते व परिसरातील नागरिकांना पोलीस प्रशासनाच्या वतीने आव्हान करत पुढे बोलताना महारुद्र परजनी म्हणाले की,दिवाळी सणाच्या निमित्ताने बाजारात खरेदीसाठी किंवा बाहेरगावी जातांना घरात पैसे, दागिने ठेऊन जाऊ नका, दीपावली किंवा लग्न समारंभासाठी बाहेरगावी जातांना मौल्यवान वस्तु, पैसे बँकेत किंवा सोबत घेऊन जावे, आपण बाहेरगावी जाणार असल्यास आपल्या शेजाऱ्यांना तसेच पोलिसांना आपण बाहेरगावी जात असल्याची माहिती द्यावी. बाहेरगावी जातांना महिलांनी प्रवासात दागिने घालुन जाऊ नये, प्रवासात कोणीही दिलेले खाद्य पदार्थ किंवा पेय खाऊ-पिऊ नयेत, त्यामध्ये गुंगीचे औषध असू शकते, प्रवासात अनोळखी महिला, पुरुषांपासून सावध रहावे.गर्दीच्या ठिकाणी व बसमध्ये चढतांना, उतरतांना आपले पॉकेट,पर्स, बॅगकडे लक्ष ठेवावे, व्यापारी, दुकानदार, सराफ यांनीही या काळात मोठ्या प्रमाणात माल खरेदी केलेला असतो. त्यामुळे रात्रीच्या वेळी सुरक्षा ठेवावी, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावावेत,बाजारामध्ये खरेदी करतांना मोबाईल किंवा पैसे वरच्या खिशात ठेऊ नये तसेच आपली गाडी व्यवस्थित ठिकाणी पार्क करुन हँडल लॉक करुन ठेवावी, ऑनलाईन फ्रॉडच्या आमिषाला बळी पडू नये,कोणी अनोळखी इसम पत्ता विचारण्याचा बहाणा करुन आपले जवळ येत असेल तर त्या पासुन सावध रहा, अशा व्यक्ती जवळ येऊन आपले गळ्यातील मैल्यवान सोन्याचे दागिणे हिसकाऊन नेऊ शकतात. तरी आपल्या परीसरात असे व्यक्ती फिरतांना आढळून आल्यास नातेपुते व परिसरातील नागरिकांनी सतर्क राहुल लागलीच नातेपुते पोलीस ठाण्याची संपर्क करावा अथवा डायल ११२ या नंबर वर संपर्क करावा.असे आवाहनही नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी केले आहे. यावेळी या बैठकीसाठी नातेपुते व परिसरातील पोलीस पाटील तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



पोलीस ऑनड्युटी चोवीस तास काम करतात. कामाचे तास निश्चित नसल्याने ड्युटी संपल्यानंतर अचानक अनुचित प्रकार घडल्यास पुन्हा बंदोबस्तावर जावे लागते.सण, उत्सवात साप्ताहिक सुट्ट्याही रद्द होतात. अहोरात्र अंगावर खाकी युनिफॉर्म घालून जनतेच्या सुरक्षिततेची धुरा सांभाळणारे पोलीस घरी एखादा महत्त्वाचा कार्यक्रम असला तरी आधी कर्तव्याला प्राधान्य देतात. कुटुंबासोबत सण, उत्सव साजरी करण्याची संधी पोलिसांना क्वचितच लाभते. सध्या दिवाळीची सर्वत्र धामधूम असून प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत आसतो. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण दिवाळीची मजा लुटत आसतो. मात्र ही दिवाळी शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन चोख कर्तव्य बजावत असतो.

**- महारूद परजणे,** (सपोनि. नातेपुते पोलीस ठाणे)

### दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्ताचे नियोजन

दोन सरकारी वाहन घेऊन नातेपुते व परिसरात पोलिसांची पेट्रोलिंग मध्ये वाढ, गावागावात ग्राम सुरक्षा यंत्रणा सज्ज, पोलीस कर्मचारी नेमून रात्र गस्तित वाढ, गर्दीच्या अनुषंगाने वेगवेगळ्या ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक, गर्दीच्या ठिकाणी साध्या वेशात पोलिसांचा वावर, सी सी टीव्हीच्या कॅमेरे द्वारे गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर गर्दीच्या ठिकाणी महिला मुलींची छेडछाड होऊ नये यासाठी दामिनी पथक सज्ज

# शहीद अशोक कामटे संघटनेच्यावतीने किल्ले बांधणी स्पर्धांचे आयोजन

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला शहर व तालुक्यात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे भव्य किल्ले बांधणी स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक निलकंठ शिंदे सर यांनी दिली.

हि स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन व खुल्या गटातील स्पर्धकही आपला सहभाग नोंदवू शकतात अशी माहिती आयोजकांकडून देण्यात आली. सांगोला शहर व तालुक्यातील लहान थोरांना दीपावलीच्या आगमनाला किल्ले बनवण्याचा



मोठा छंद आहे, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य संपूर्ण विश्व तलावर ज्ञात असून येणाऱ्या पुढच्या पिढीला गडकिल्ल्यांच्या माध्यमातून हे कार्य पुढे येणार आहे याकरता शहीद अशोक कामटे संघटना सातत्याने अशा वेगवेगळ्या विधायक उपक्रमांना गेल्या 16 वर्षापासून सातत्याने पाठबळ देण्याचे काम करते त्यामुळे प्रतिवर्षीप्रमाणे दिवाळी सुट्टीत किल्ले बांधणी, किल्ले सजावट स्पर्धा 2025 करिता सहभागी स्पर्धकांनी नाव नोंदणी दि.16 ऑक्टोंबर ते 21 ऑक्टोबर 2025 पर्यंत शिंदे मशिनरी स्टोअर्स, स्टेशन रोड सांगोला या ठिकाणी करावी. अधिक माहितीसाठी प्रा प्रसाद खडतरे, मकरंद पाटील 9850048514,9420726303 यांच्याशी संपर्क साधून या भ्रमणध्वनीवर नोंदणी करून आपले किल्ल्यांचे फोटो व व्हिडिओ व्हाट्सअप वर सर्व माहिती सहित पाठवावेत असे आव्हान शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.

# माढा बातमी महा आरोग्य शिबीर 700 तपासणी

**माढा (कटूसत्य वृत्त):-** धावपळीच्या युगात पैसै कमविण्यात जो तो दंग आहे.मात्र स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. सदृढ आरोग्याच्या दृष्टीकोनातून ठरावीक काळाने आरोग्य तपासण्या कराव्यात असे मत राजवी ॲग्रोचे चेअरमन प्रा.शिवाजीराव सावंत यांनी सांगितले.

उपळाई (खुर्द) ता.माढा येथे कुषी भूषण कै. गणेश कुलकर्णी यांच्या १४व्या पुण्यस्मरणा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य मोफत तपासणी शिबिराच्या उद्धघाटन प्रसंगी प्रा.सावंत बोलत होते. शिबीरात ७३१ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

कै.गणेश कुलकर्णी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत दिप प्रज्वलन करुन उद्धघाटन पार पडले. राजवी ॲग्रोचे चेअरमन प्रा.शिवाजीराव




सावंत, माजी सनदी अधिकारी प्रकाश कुलकर्णी, ज्योती कुलकर्णी, नगराध्यक्षा मीनल साठे, कल्पना जगदाळे, संजय पाटील घाटणेकर नितीन कापसे, भारत शिंदे, विलास देशमुख, मुन्ना साठे, शंभू साठे, ॲड. यशोदा ढवळे, ॲड. रत्नप्रभा जगदाळे, निलेश पाटील, आबा साठे, अनिस तांबोळी आदी उपस्थित होते. लहान बालकांपासून ते वयोवृध्दा पर्यत सर्वच दुर्धर आजारावरील आरोग्याची तपासण्या या शिबिरात पार पडल्या.

डॉ.सुभाष पाटील, डॉ. अल्पेश दोषी, डॉ.दर्शन बंग,डॉ. विकास मस्के, डॉ. विजयकुमार लोंढे या डॉक्टरांनी रुग्णांच्या तपासण्या करुन आरोग्य सल्ले देण्यात आले.

ज्योती कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी यांनी मनोगतातून गणेश कुलकर्णी यांच्या कायार्ची माहिती देऊन कै. गणेश कुलकर्णी प्रतिष्ठानच्या कामाचा आढावा मांडला. शिबीर यशस्वीते साठी गणेश कुलकर्णी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# वकील व पोलिसांना कर्ज कायद्याने बँका नाकारू शकत नाहीत – ॲड. चव्हाण

**मुंबई (वृत्त सेवा) :-** वकील आणि पोलीस अधिकारी हे समाजातील न्याय आणि कायदा-सुव्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत. मात्र अलीकडच्या काळात काही बँकांकडून या दोन व्यवसायातील व्यक्तींना क्रेडिट कार्ड अथवा कर्ज नाकारल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या संदर्भात ॲड. शंकर चव्हाण, मुंबई उच्च न्यायालयांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, ह्लवकील व पोलीस यांना बँका क्रेडिट कार्ड किंवा कर्ज कायद्याने नाकारूच शकत नाहीत.ह्व ॲड. शंकर चव्हाण यांनी सांगितले की, बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कर्ज आणि क्रेडिट कार्ड देताना ठरावीक पारदर्शक निकषांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यात उत्पन्न, व्यवहार इतिहास, कर्जफेड क्षमता, आणि क्रेडिट स्कोअर यांचा विचार केला जातो. मात्र, व्यवसाय हा एकटाच कारण ठरवून बँकांनी सेवा नाकारणे हे कायदेशीर दृष्ट्या चुकीचे आणि "निष्पक्ष पद्धती संहिता" च्या विरोधात आहे. ते पुढे म्हणाले, 'वकील आणि पोलीस हे दोघेही सार्वजनिक सेवेशी संबंधित असून त्यांच्या उत्पन्नाची पारदर्शकता आणि जबाबदारी उच्चस्तरीय आहे. तरीदेखील काही बँका या व्यवसायांना 'जोखीम गट' म्हणून वर्गीकृत करतात आणि क्रेडिट कार्ड किंवा कर्ज



नाकारतात. हा प्रकार भेदभावपूर्ण आहे आणि संविधानातील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करतो.' भारतीय रिझर्व्ह बँकेच्या "निष्पक्ष पद्धती संहिता" नुसार, कोणत्याही बँकेने जर ग्राहकाचा अर्ज नाकारला, तर त्याचे तर्कसंगत आणि लेखी कारण देणे बंधनकारक आहे. जर बँकेने फक्त व्यक्तीचा व्यवसाय लक्षात घेऊन निर्णय घेतला असेल, तर ते कारण ग्राह्य धरले जाणार नाही. अशा प्रकरणात संबंधित व्यक्ती फइकच्या "बँकिंग लोकपाल योजना", ग्राहक न्यायालय, किंवा रिझर्व्ह बँकेच्या तक्रार पोर्टल वर तक्रार दाखल करू शकतो.

ॲड. चव्हाण यांनी या संदर्भात वकील आणि पोलिसांना आवाहन केले की त्यांनी बँकेकडून नकार मिळाल्यास लेखनात कारण मागावे आणि योग्य कायदेशीर मार्ग अवलंबावा. ते म्हणाले, 'बँकिंग सेवा न देणे हे केवळ आर्थिक अन्याय नाही, तर समाजाच्या विश्वासावरचा घाव आहे. बँकिंग म्हणजे फक्त व्यवहार नव्हे, तो नागरिक आणि संस्थेतील विश्वासाचा करार आहे. प्रत्येक नागरिकाला समान आर्थिक संधी मिळणे हा त्याचा संविधानिक अधिकार आहे.ह्व ह्लवकील व पोलीस यांना कर्ज किंवा क्रेडिट कार्ड नाकारणे हे कायदेशीरदृष्ट्या अस्वीकार्य आहे. अशा निर्णयांविरोधात नागरिकांनी आवाज उठवावा आणि न्यायिक मार्गाने तक्रार करावी.ह्व ॲड. शंकर चव्हाण यांच्या म्हणण्यानुसार, देशातील प्रत्येक वकील आणि पोलीस अधिकारी हा जबाबदारीने काम करणारा नागरिक आहे. त्यांना बँकिंग सुविधा न देणे म्हणजे त्यांच्या प्रामाणिक सेवेचा अवमान आहे. अशा प्रकारच्या भेदभावाला समाजानेही विरोध करणे गरजेचे आहे. अंततः, त्यांनी स्पष्ट केले की, 'बँकांनी आपल्या जोखीम धोरणांना व्यावसायिक निकषांवर ठेवावे, पण व्यवसायावर आधारित भेदभाव नको. वकील आणि पोलीस यांना क्रेडिट कार्ड किंवा कर्ज नाकारणे हे केवळ अन्यायकारकच नाही, तर कायद्याच्या आणि संविधानाच्या तत्वांवरही प्रहार आहे.' तसेच त्यांनी आरबीआई कडे तातडीने याबाबत ईमेल केला आहे.

# पोलीस आयुक्तालयात डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर पोलीस आयुक्तालयामध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, शास्त्रज्ञ आणि "जनतेचे राष्ट्रपती" म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती अत्यंत उत्साहात व सन्मानाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. कलाम यांचे विज्ञान व शिक्षण क्षेत्रातील योगदान, त्यांच्या विचारसंपदेची प्रेरणा आणि युवकांप्रती असलेले प्रेम यांचा उल्लेख करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात डॉ. कलाम यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला. तसेच, पोलीस दलातील काही जवान व अधिकाऱ्यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांवर आधारित भाषणे सादर केली. 'स्वप्न तेच जे तुम्हाला झोप लागू देत नाहीत' या त्यांच्या प्रसिद्ध विचाराचा संदर्भ देत, युवकांनी प्रेरणा घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संयोजन पोलीस आयुक्तालयातील सांस्कृतिक समितीने केले होते. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या विचारांची ठिणगी प्रत्येकाच्या मनात चेतवण्यासाठी सोलापूर पोलीस दल सदैव प्रयत्नशील राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.